**२. शरीराचे मरण:**


शिवाय मृत्युचा यापुढील परिणाम म्हणजे शरीराचे मरण: **“तू आपल्या निढळाच्या घामाने भाकर मिळवून खाशील व अंती पुन: मातीला जाऊन मिळशील, कारण तिच्यातून तुझी उत्पत्ती झाली आहे. तू माती आहेस आणि मातीला परत जाऊन मिळशील”** (उत्पत्ती ३:१९). मनुष्याच्या पतनामुळे संपूर्ण सृष्टीला शाप आला आहे व ती ऱ्हास पावत आहे.

**३. सार्वकालिक मरण:**

मृत्युच्या रेल्वेचे मुक्कामाचे ठिकाण म्हणजे ‘सार्वकालिक मरण’ होय. तेथे मनुष्याचे अस्तित्व संपुष्टात येणार नाही, तर देवापासूनच्या सार्वकालिक वियोगात तसेच पुढे चालू राहील. तेथे देवाचा क्रोध भोगावा लागेल. कारण एकाच अपराधामुळे सर्व माणसांना दडांज्ञा होते (रोम ५:१५). प्रभू येशूने या जागेला सार्वकालिक नरक असे संबोधले आहे. ही जागा मानवी कल्पनेपलिकडेही भीषण अशी आहे. तेथील अग्नी न विझणारा (मार्क ९:४३,४५); आणि सार्वकालिक आहे (मत्तय २५:४१). **“तेथे रडणे व दात खाणे चालेल”** (लूक १३:२८). ती रक्त गोठवणारी भयानक जागा आहे. जेथे ‘त्यांचा किडा मरत नाही व अग्नी विझत नाही’ (मार्क ९:४८), तसेच ती सार्वकालिक नाशाचीही जागा आहे (२ थेस्सल १:९).

तर मग मानवाने स्वत:च तयार केलेल्या या नाशाच्या मार्गाचे, देव कशाप्रकारे अवलोकन करतो? मानवाला पापाच्या सत्तेतून मुक्त करण्यासाठी देवाने मानव जातीसाठी असणाऱ्या अमर्याद कृपेखातर व अगाध प्रीतीखातर आपला एकूलता एक पुत्र वधस्तंभावर मरण्याकरीता या पृथ्वीवर पाठवला. मानवाच्या तारणाची ही योजना देवाने युगारंभापूर्वीच आखली होती. ज्यावेळी येशूने म्हटले, **“पूर्ण झाले आहे”** (योहान १९:३०) त्यावेळी ही योजना पूर्ण झाली.

नरकाच्या सार्वकालिक अग्नीपासून सर्वांची सूटका करावी अशी देवाची उत्कंट इच्छा आहे (१ तीमथ्य २:४). देवाची अशी इच्छा आहे की आपण ‘मृत्युच्या रेल्वेमधून जीवनाच्या रेल्वेमध्ये’ उडी मारावी. सार्वकालिक जीवनाकडे जाणाऱ्या अरूंद दरवाजाने जाण्यासाठी देव आपल्याला आमंत्रित करत आहे (मत्तय ७:१३,१४). पवित्र शास्त्र सांगते की, मुक्ती (तारण) मिळविण्यासाठी प्रभू येशू ख्रिस्त हेच एक व्दार आहे. येशूने म्हटले, **“मार्ग, सत्य व जीवन मीच आहे, माझ्याव्दारे आल्यावाचून पित्याकडे (स्वर्गाच्या राज्यात) कोणी येत नाही”** (योहान १४:६). जर आपण जीवनाच्या रेल्वेमध्ये सवार झालो, तर आपण सार्व कालिक जीवनाच्या मार्गावर प्रवास करू. मृत्युच्या रेल्वेतून उतरून जीवनाच्या रेल्वेमध्ये सवार होणे म्हणजेच **“प्रभू येशू ख्रिस्ताकडे वळणे.”** पश्चाताप करून त्याच्याकडे पापक्षमेची याचना करणे आणि त्याला आपला वैयक्तीक तारणारा स्वीकारून; त्याच्याशी एकनिष्ठ राहणे. ज्यावेळी आपण असे करतो त्यावेळी देवाच्या दृष्टीने आपण एक नवी उत्पत्ती असतो. प्रभू येशू ख्रिस्तामध्ये आपला




नवा जन्म होतो व आता आपण देवाचे मुलं होतो. पापक्षमेची ही अद्भूत देणगी आपल्या प्रत्येकासाठी व्यक्तीश: आणि मोफत उपलब्ध आहे.

कृपेच्या ह्या देणगीसाठी **“त्याच्या पुत्राचे बलिदान”** ही सर्वात मोठी व कधीही भरपाई देता येणार नाही, अशी किंमत देवाला मोजावी लागली आहे. म्हणून आज जर आपण देवाने देऊ केलेली ही देणगी स्वीकारतो, तर आपल्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे (योहान ५:२४). **ही संधी तुम्ही ह्या पृथ्वीतलावर जिंवत आहांत तोपर्यंतच उपलब्ध आहे.** म्हणून आजच निर्णय घ्या आणि जीवनाच्या रेल्वेमध्ये सवार व्हा. (कारण आपल्यापैकी कोणीही उद्याच्या दिवसाची खात्री देऊ शकत नाही.)

## जीवनाचा मार्ग!

मला आठवते, एकदा माझे व्याख्यान संपल्यानंतर एक तरूण माझ्याजवळ आला. मी त्याला विचारले, **“आता तू कोठे आहेस?”** त्याने मला थोडक्यात उत्तर दिले, **“मी आता प्लॅटफॉर्मवर उभा आहे.”** त्याला आता एक गोष्ट निश्चितार्थाने कळाली होती की: त्वरेने त्याने मृत्युच्या रेल्वेला अलविदा म्हटले पाहिजे! त्याने मला विचारले, **“जीवनाच्या रेल्वेमध्ये मी कसा सवार होऊ शकतो?”** मी त्याला मार्ग दाखवला आणि तो आता सार्वकालिक जीवनाच्या मार्गावर आनंदाने प्रवास करत आहे.

देवाला पापाचा तिटकारा आहे. पण तो पाप्यांवर प्रीती करणारा देव आहे. जर तुम्ही आज जीवनच्या रेल्वेमध्ये सवार होत आहात, तर असे एक निवासस्थान **“डोळयाने जे पाहिले नाही, कानाने जे ऐकले नाही व माणसाच्या मनात जे आले नाही”**(१ करिंथ २:९); त्या अशा निवासस्थानात तुमचे स्थान आरक्षित करत आहात. तुमचे सार्वकालिक घर तुमच्या पासून केवळ एक पाऊल दूर आहे. आजच निर्णय घ्या!

तर मग सांगा तुम्ही काय निवडून घ्याल; मृत्यु की जीवन? स्वर्ग की नरक? देव आज आपणा सर्वांना सावध करत आहे की, **“जीवन व मरण आणि आशीर्वाद व शाप मी तुझ्यापुढे ठेवले आहेत; म्हणून तू जीवन निवडून घे ...”** (अनुवाद ३०:१९). या वचनावरून आपण पुन्हा एकदा पाहतो की, देवाची इच्छा स्पष्टपणे केवळ जीवनाकडेच लक्ष वेधते.

सोबत दिलेल्या आकृतीवरून आपल्याला स्पष्ट समजते की,
जर आपण एकदाच जन्मलो (नैसर्गिक जन्म),
तर आपण दोनदा मरणार (प्रथम शरीराचे मरण, नंतर सार्वकालिक मरण).
पण जर आपण दोनदा जन्मलो (नैसर्गिक जन्म, नंतर ख्रिस्तामध्ये नवा जन्म),
तर आपण एकदाच मरणार (केवळ शरीराचे मरण)!

देवाच्या पुत्रावर (प्रभू येशू ख्रिस्तावर) विश्वास ठेवल्याने तुम्ही देवाच्या न्याय दंडातून मुक्त व्हाल आणि तुम्हाला सार्वकालिक जीवनाची खात्री मिळेल. प्रभू येशू ख्रिस्त असे आश्वासन देतो की, **“मी तुम्हांला खचित खचित सांगतो, जो माझे वचन ऐकतो आणि ज्याने मला पाठवले त्याच्यावर (देवावर) विश्वास ठेवतो त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे; आणि त्याच्यावर न्यायाचा प्रसंग येणार नाही, तो मरणातून जीवनात पार गेला आहे”** (योहान ५:२४).

यावरून आपल्या निदर्शनास येते की, विश्वासावरच सर्व गोष्टी अवलंबून आहेत. ‘आपल्या शारीरिक मृत्युनंतर आपले काय होणार?’ हे पूर्णपणे आपल्या विश्वासावरच ठरविले जाईल. जर आपण उत्क्रांतीवादाच्या सिध्दांतावर विश्वास ठेवणारे असू, तर या सिध्दांताच्या मृत्यु बाबतच्या शिकवणीचे परिणाम किती भयंकर आहेत हे आपल्या लक्षात आलेच असेल. कारण उत्क्रांतीवादाचा सिध्दांत सार्वकालिक मृत्युच्या धोक्याला पडद्याआड करतो आणि त्यामुळे सार्वकालिक मृत्युच्या संकटातून मुक्त होण्यासाठी देवाने प्रभू येशू ख्रिस्ताव्दारे मोफत देऊ केलेल्या देणगीला आपण कायमचे गमावू शकतो. पण प्रभू येशू ख्रिस्त आपणाला अधोलोकाच्या व नरकाच्या यातनांपासून सोडविण्यास आला आहे. म्हणून आजच आपण खऱ्या जिवंत देवाकडे प्रार्थनापूर्वक वळूया आणि मृत्युच्या रेल्वेचा त्याग करून जीवनाच्या रेल्वेमध्ये उडी घेऊया. तुमच्या जीवनामध्ये देवाने हा आमूलाग्र बदल घडवून आणावा म्हणून खालीलप्रमाणे प्रार्थना करा:

“हे प्रभू येशू ख्रिस्ता, मला माझ्या दयनीय अवस्थेची जाणीव झाली आहे. माझ्या जीवनाचा मार्ग तुझ्या वचनाशी जराही जुळत नाही. आता मला कळून चुकले आहे की, मी चूकीच्या रेल्वेमध्ये प्रवास करत आहे. माझे डोळे उघडले आहेत आणि मी तुला काकुळतेने विनवणी करतो की, मला मदत कर. माझ्या सर्व अपराधांची मला क्षमा कर. मी त्यांबद्दल तुझ्याकडे पश्चाताप करतो. तुझ्या वचनाव्दारे माझे जीवन बदल आणि त्यानुसार जगण्यास शिकीव. तुझ्या मदतीने, मी जीवनाच्या रेल्वेमध्ये सवार होऊ इच्छितो आणि कायमचे तुझ्याबरोबर राहू इच्छितो. मी तुला माझ्या आयुष्यामध्ये स्वीकारतो. तू माझा प्रभू हो आणि तुला अनुसरण्यासाठी लागणारी इच्छा व सामर्थ्य पुरीव. मी अंत:करण पूर्वक तुझे आभार मानतो कारण माझ्या पापांपासून तूच मला तारले आणि देवाचे मुलं होण्याचा हक्क दिला. आमेन.”



डॉ. वर्नर गिट्





Original Title: Reise ohne Rückkehr
Author‘s home page: www.wernergitt.de
Cover design: Elise Christian

Bruderhand-Medien
Am Hofe 2, 29342 Wienhausen, Germany
Tel.: +49 (0) 5149 9891-0, Fax: -19
E-Mail: info@bruderhand.de; Site: bruderhand.de

Nr. 127-75 – Marathisch / Marathi – edition 2021


# एकमार्गी यात्रा




## मृत्यु ... मग पुढे काय?

वर्नर गिट्


127-75 Reise Marathi Aufl 1 2015-03-27.indd 1-5
10.02.2021 12:21:08

# एकमार्गी यात्रा

उत्तर इटलीतील दक्षिण टायरॉल गावमध्ये एक चर्च आहे. या चर्चच्या आवारात एका कठडयावर चार मानवी कवटया ठेवलेल्या आहेत. तेथे एक फलक लटकवण्यात आला असून त्यावर पुढील मजकूर आहे, ***“मूर्खाची कवटी कोणती? ज्ञानी माणसाची कोणती? भिकाऱ्याची कोणती? आणि राजाची कोणती?”*** राजाची हुकमत आणि त्याची संपत्ती; आता अस्तित्वात नसल्याने राजाची कवटी कोणती याचा सुगावा लागण थोड कठीण आहे. कदाचित, राजाच्या बाजूलाच भिकाऱ्याची कवटी असेल, पण भिकाऱ्याची गरीबी, त्याची लक्तरं आणि उपाशी पोट यांचा तिथे लवलेशही नसल्याने भिकाऱ्याची कवटी कोणती हे सांगणही तितकच कठीण! थोडक्यात ***“कोणती कवटी कोणाची?”*** हे ओळखण पूर्णत: अशक्यचं आणि म्हणून वरील फलकाशेजारी आणखी एक फलक लावण गरजेच आहे; ज्यावर लिहल असेल ***“यांना मृत्युने एकसमान केले!”*** पण ह्या विधानात खरोखरच काही तथ्य आहे का? चला तर मग हे पडताळून पाहूया.

आपण नेहमी अनुभवतो की, एखादी कंपनी स्वत:चे उत्पादन खपवण्यासाठी समाजातील केवळ विशिष्ट गटाच्या लोकांपुरतीच जाहिरातबाजी करते, तसा मृत्यु लोकालोकांमध्ये किंवा गटागटांमध्ये अजिबात भेद करत नाही. श्रीमंत असो वा गरीब, भिकारी असो वा राजा, ज्ञानी असो वा मूर्ख, तरूण असो वा म्हातारे, पुरूष असो वा स्त्री मृत्युला कोणीही चकमा देऊ शकत नाही. कवी इम्मानुएल गायबेल यांच्या मतानुसार, प्रत्येक मनुष्यासाठी मग तो तत्वज्ञानी, कवी, राजकारणी, खेळाडू, अभिनेता, अडाणी किंवा उच्चशिक्षित कोणीही असू दे **“जीवन जर एक न उलघडलेले कोडे आहे, तर मृत्यु एक सार्वकालिक गूढ रहस्य आहे”**. आता पुरातन इजिप्तच्या लोकांचेच उदाहरण घ्या ना, मृत्युच्या स्मरणार्थ त्यांनी किती मोठाले पिरॅमिडस् बांधले आहेत. पण असा एखादा मानवी प्रयत्न काही लाभाचा आहे का? मृत्युचे हे गूढ रहस्य जाणून घेण्यासाठी मानवाने जे काही प्रयत्न केले आहेत त्यापैकी उत्क्रांतीवादाचा सिध्दांत निश्चितपणे सर्व जगभर प्रख्यात आहे.

## मृत्युबद्दल उत्क्रांतीवादाच्या सिध्दांताचा दृष्टीकोण:

उत्क्रांतीवादाच्या जडण घडणीत मृत्युला एवढे मूलभूत स्थान आहे की, आपल्याला असा निष्कर्ष काढावा लागतो: मृत्यु शिवाय पृथ्वीवर जीवन उदयास येऊच शकत नाही. हे विधान खाली दिलेल्या उत्क्रांतीवादाच्या चार प्रमुख तत्वांवरून स्पष्ट होते.

**१. मृत्यु – उत्क्रांतीसाठी आवश्यक बाब**

कार्ल फ्रेड्रिच वायझास्कर नामक पदार्थ विज्ञान शास्त्रज्ञाने विधान केले की, *“सजीव मेले नाहीत तर उत्क्रांती होणार नाही आणि नवीन सजीव नवीन गुणविशेषांसह उदयास येणार नाहीत. सजीवांचा मृत्यु ही उत्क्रांतीसाठी असणारी पूर्वावश्यकता आहे”*.

**२. मृत्यु – उत्क्रांतीचे फलित**

दक्षिण जर्मनीतील रिजेन्स्बर्ग येथील जीवशास्त्राचे प्राध्यापक विदमार टान्र मृत्युबद्दल अस्तित्ववादी व सर्मथन करण्याजोगा एक प्रश्न विचारतात, *“जर मृत्युची गरजच नव्हती तर कसा आणि का मृत्युने जगामध्ये प्रवेश केला?”* आणि त्याचे उत्तरही तेच देतात, *“वृध्द होण्याची प्रक्रिया व आयुमर्यादा हे दुसरे काही नसून उत्क्रांतीच्या ओघात अनुकूलनासाठी घडून आलेल्या केवळ निसर्ग घटना आहेत. खरे पाहता, मृत्यु हे उत्क्रांतीच्या प्रगतीसाठी लागणारे मुख्य साधन आहे”*. ह्या प्राध्यापक महाशयांच्या मते मृत्युची अंतर्भूत आज्ञावली उत्क्रांतीला नवनवीन प्रयोग करण्यासाठी लागणारी सततची संधी पुरवीत आहे.

**३. मृत्यु – जीवनाचा जनक**

उत्क्रांतीवादाचा सिध्दांत ज्यावेळी मृत्युला जीवनाच्या निर्माणकर्त्याचा दर्जा देतो, त्यावेळी उत्क्रांतीवादाचा हा मानवी दृष्टीकोण पवित्र शास्त्र म्हणजे बायबल मधील सत्याशी किती मोठी तफावत दर्शवितो. सुक्ष्मजीवशास्त्रज्ञ रिनहार्ड डब्लू. कॅपलन यांनी अस मत व्यक्त केल की, *“अंतर्भूत अशी वृध्द होण्याची आणि मरण्याची प्रक्रिया बऱ्याच व्यक्तींसाठी मन सुन्न करणारी किंवा क्लेशकारक आहे. पण उत्क्रांतीतूनच जीवसृष्टी उदयास आली या वास्तविकतेसाठी मोजावी लागणारी हीच ती किंमत आहे”*.



**४. मृत्यु – जीवनाचा निश्चित अंत**

उत्क्रांतीवादाच्या सिध्दांतानुसार जीवन हे पूर्णत: पदार्थांच्या गुणधर्मावर अवलंबून आहे. येथे आपण पाहतो की, उत्क्रांतीवादाचा सिध्दांत मृत्यु नेमका काय आहे याचे समाधानकारक स्पष्टिकरण देऊ शकत नाही. जर जीवन आणि मृत्यु बद्दलची आपली विचारसरणी केवळ निर्जीव अशा पदार्थावर आधारलेली असेल तर **‘मृत्यु नंतरही जीवन असू शकते’** या आपल्या मनातील जाणीवेला काहीच जागा उरत नाही. उत्क्रांतीवादाच्या सिध्दांतानुसार संपूर्ण मणुष्य जात केवळ एक जैविक यंत्र असून त्यांचा मृत्यु उत्क्रांतीच्या वाटचालीत मागाहून येणाऱ्या जीवनासाठी केवळ एक माध्यम आहे आणि म्हणून मृत्युनंतर ते निरूपयोगी होतात. मनुष्यजीवनाचे योगदान केवळ हेच ते काय!

## मग कोणाकडे उत्तर आहे?

मग असा कोणी व्यक्ती आहे का जो मृत्यु आणि मृत्युनंतरच्या अस्तित्वाबाबत आपल्या मनात घुटमळणाऱ्या; या खळबळजनक प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल? जर असा कोणी व्यक्ती आहे तर त्याला खाली नमूद करण्यात आलेल्या चार सक्त किंवा कडक अटी पूर्ण कराव्या लागतील:

१. त्याने स्वत: मृत्यूचा अनुभव घेतलेला असला पाहिजे, जेणेकरून तो आपल्याला मृत्युचा प्रथमदर्शी अनुभव सांगू शकेल.

२. तो मरणातून जिवंत होऊन परत आला असला पाहिजे, जेणेकरून त्याबद्दलही तो आपल्याला सांगू शकेल.

३. त्याचे मरणावर प्रभुत्व असले पाहिजे.

४. तो पूर्णपणे विश्वासू असला पाहिजे, जेणेकरून तो जे काही आपणाला सांगेल त्यावर आपण नि:संदेह विश्वास ठेवू.

जगाच्या संपूर्ण इतिहासात केवळ एकच व्यक्ती आहे, जो ह्या सर्व अटी सशर्थपणे पूर्ण करू शकतो आणि तो म्हणजे **“प्रभू येशू ख्रिस्त”**!

१. यरूशलमेच्या वेशीबाहेर कालवरीच्या टेकडीवर त्याला वधस्तंभावर खिळण्यात आले आणि तो मरण पावला. त्याच्या शत्रूंना तो मेला आहे ह्याची खात्री करून घ्यायची होती म्हणून त्यांनी त्याच्या कुशीत भाला भोसकला आणि लागलेच रक्त व पाणी बाहेर निघाले (योहान १९:३४). यामुळे त्यांची खात्री पटली की तो मेला आहे. [पहिली अट पूर्ण]

२. त्याने अगोदरच स्वत:विषयी असे सांगितले होते की तो तिसऱ्या दिवशी मरणातून पुन्हा उठेल. वास्तविक तसे घडून आले आणि ज्या स्त्रीया आठवडयाच्या पहिल्या दिवशी भल्या पहाटे येशूच्या कबरेजवळ गेल्या होत्या त्या या घटनेच्या साक्षीदार आहेत. त्यांना देवदूतांकडून असे सांगण्यात आले, **“तो येथे नाही, तर उठला आहे!”** (लूक २४:६) [दुसरी अट पूर्ण]

३. ‘प्रभू येशू ख्रिस्ताने लोकांना मरणातून उठविले (जिवंत) केले’ अशा तीन घटनांचा उल्लेख नव्या करारात करण्यात आला आहे. बेथानी गावचा लाजारस (योहान ११:४१–४५), नाईन गावच्या विधवेचा मुलगा (लूक ७:११–१७), याईराची मुलगी (मार्क ५:३५–४३). या घटना सत्य आहेत आणि त्या हे दर्शवितात की केवळ प्रभू येशू ख्रिस्तालाच मरणावर प्रभुत्व आहे. [तिसरी अट पूर्ण]

४. या पृथ्वीतलावर जन्मलेल्या सर्व व्यक्तींपैकी केवळ प्रभू येशू ख्रिस्तच आपल्या मुखातील वचनाशी एकनिष्ठ राहीला. तो म्हणाला, **“मी सत्य आहे”** (योहान १४:६). त्याच्या शत्रूंनी त्याच्या विरूध्द पुरावे शोधले, परंतु ते त्यांना मिळाले नाहीत; त्यांनी त्याच्याविरूध्द अनेक खोटे साक्षीदार उभे केले, परंतु त्यांच्या साक्षीत मेळ बसेना (मार्क १४:५५,५६). त्याने पाप केले नाही आणि त्याच्या मुखात कपट आढळले नाही (१ पेत्र २:२२). [चौथी अट पूर्ण]

तर मग, जो सर्व सत्याचा स्त्रोत त्याच्याजवळ आपण येऊन पोहचलो आहोत का? सत्य सर्वांसाठी आवश्यक बाब आहे. आपल्यापैकी असा कोण आहे जो असत्यावर अवलंबून राहून आपले जीवन जगील? मृत्यु बाबतच्या या चर्चेत आपण आता अशा वळणावर येऊन पोहचलो आहोत की; आपण हे पूर्णत: समजून घेतले पाहिजे की केवळ प्रभू येशू ख्रिस्ताकडेच आपल्या सर्व प्रश्नांचे आणि शंकांचे निरसण करण्याची पात्रता व योग्यता आहे. आपण मेल्यानंतर लगेच आपले काय होणार याबाबत तो आपल्याला सांगतो. लूक १६:१९–३१ मध्ये येशू दोन व्यक्तींची उदाहरणे देतो. त्यापैकी एक (दरिद्री लाजर) देवाला ओळखीत होता व त्याचा देवावर विश्वास होता. दुसरा (श्रीमंत मनुष्य) देवाला ओळखीत नव्हता व त्याचा देवावर विश्वास नव्हता. लाजर मेला आणि देवदूतांनी त्याला अब्राहामाच्या उराशी, ज्या ठिकाणाला येशूने सुखलोक म्हटले (लूक २३:४३) त्या ठिकाणी नेऊन ठेवले. त्याला आता तेथे समाधान मिळत आहे. श्रीमंतही मेला व त्याने स्वत:ला अधोलोकात असलेले पाहून आपल्या दयनीय अवस्थेबद्दल उद्गार काढले, **“ह्या अग्नीत मी क्लेश भोगीत आहे”** (लूक १६:२४). प्रभू येशूने दिलेल्या या उदाहरणावरून आता आपल्या लक्षात आले असेलच की, आपण सुरूवातीला केलेले विधान पूर्णपणे चुकीचे आहे. **“मृत्यु कोणालाही एकसमान करू शकत नाही”** हेच खरे सत्य आहे. जर आपण असं मानल की, जीवन एक मोठा अथांग सागर आहे तर थोडा विचार करा मृत्युच्या भिंतीपलीकडे असणाऱ्या खोल दरीचे वर्णन किंवा स्पष्टीकरण आपण कसे देऊ शकू?

## मृत्यु : तीन प्रकारचा

पवित्र शास्त्र (बायबल) निर्विवादपणे सांगते की जग व त्यातील सर्व काही देवाने निर्माण केले आहे. ही निर्मिती परिपूर्ण व निर्दोष होती. देवाने तिला **“फार चांगले”** असे संबोधले. देवाने आपल्या कुशल कारागिराव्दारे (नीती ८:३०) म्हणजेच प्रभू येशू ख्रिस्ताव्दारे (योहान १:१०, कलस्सै १:१६) या सृष्टीची निर्मिती केली आणि आपल्या सौम्य, करूणामय व प्रेमळ स्वभावाचे मानवजातीला दर्शन घडविले. कारण सृष्टीच्या निर्मितीपासून त्याच्या अदृष्य गोष्टी म्हणजे त्याचे सनातन सामर्थ्य व देवपण ही निर्मिलेल्या पदार्थांवरून ज्ञात होऊन स्पष्ट दिसत आहेत, अशासाठी की त्यांना (मानवांना) कसलीही सबब राहू नये (रोम १:२०). याउलट उत्क्रांतीवादाचा सिध्दांत वेदना, अश्रू, निष्ठुरता आणि मरण यांचे दर्शन घडवितो. जो कोणी असे मानतो की, देवानेच उत्क्रांती घडवून आणली आणि हीच त्याची निर्मिती प्रक्रिया होती; तर तो व्यक्ती देवाचे चरित्र व स्वरूप अयोग्य प्रकारे लोकांपुढे मांडत आहे. त्यामुळे ही कल्पना की देव उत्क्रांती संचलित करीत आहे एकंदरीत असमर्थनीय आहे.

जर उत्क्रांती मृत्युला कारणीभूत नाही आणि देवाचे स्वभावगुणही मृत्युशी जुळत नाहीत तर मग या जगामध्ये मृत्यु आला तरी कोठून? सर्वप्रथम आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, मृत्यु सार्वत्रिक किंवा वैश्विक आहे. सर्व सजीव मरण पावतात आणि मानवही याला अपवाद नाही. मग तो तरूण असो वा वृध्द, नितीमान असो वा चोर किंवा खूनी, विश्वासणारा असो वा अविश्वासणारा; सर्वजण मरतात. मग मृत्युच्या ह्या अशा सार्वत्रिक आणि जहाल परिणामाचे कारणही तितकेच जहाल असले पाहिजे.

पवित्र शास्त्र (बायबल) सांगते की, मृत्यु किंवा मरण हे पापाची निष्पत्ती आहे. देवाने धोक्याची सूचना (उत्पत्ती २:१७) दिलेली असतानाही, मनुष्याने त्याला मिळालेल्या स्वातंत्र्याचा गैरवापर केला. ज्या क्षणी पाप जगात शिरले, त्याचक्षणी **“पापाचे वेतन मरण”** (रोम ६:२३) हा कायदाही लागू झाला. अशाप्रकारे मनुष्याने स्वत:ला मृत्युच्या मार्गात आणून ठेवले (आकृती पहा). आपण त्याला मृत्युची रेल्वे म्हणू शकतो. ज्या आदामामुळे या जगात पापाने प्रवेश केला, त्या आदामापासून ते आतापर्यंत संपूर्ण मनुष्यजात मृत्युच्या या रेल्वेमध्ये सवार झाली आहे. कारण पवित्र शास्त्र सांगते, **“एका माणसाच्या व्दारे पाप जगात शिरले आणि पापाच्या व्दारे मरण शिरले; आणि सर्वांनी पाप केल्यामुळे सर्व माणसांमध्ये अशाप्रकारे मरण पसरले”** (रोम ५:१२). पण मनुष्याच्या पतनापूर्वी संपूर्ण सृष्टीला मृत्युची ओळख सुध्दा नव्हती.

पवित्र शास्त्र ‘मृत्यु हे सर्व गोष्टींचा अंत आहे’ असे शिकवत नाही. पवित्र शास्त्रानुसार मृत्यु किंवा मरण म्हणजे **“विभक्त होणे किंवा दुरावणे”**. मानवाचे पतन तीन प्रकारचा मृत्यु दर्शविते (आकृती पहा), त्यामुळे हे **“विभक्त होणे किंवा दुरावणे”** सुध्दा तीन प्रकारचे असले पाहिजे.

**१. आत्म्याचे मरण:**

ज्या क्षणी मनुष्याने देवाची आज्ञा मोडली त्याचं क्षणी मनुष्याचा आत्मा मरण पावला. याचाच अर्थ असा की, देवाच्या सहभागीतेपासून मनुष्य हद्दपार झाला. आजच्या दिवसापर्यंत संपूर्ण मनुष्य जातीची तिच अवस्था कायम आहे आणि ते देवाच्या सान्निध्यास पारखे झाले आहेत. त्यांना अजूनही उमगले नाही की आपणाला निर्माणकर्त्या देवाशिवाय पर्याय नाही. आपण केवळ त्याच्यावरच अवलंबून राहिले पाहिजे. ते स्वत:च आपल्या आयुष्याचे मालक बनले आहेत. ते असं काही जीवन कंठीत आहेत की, जणू काय देव अस्तित्वातच नाही. ते आपल्याच भ्रमांत अडकून पडले आहेत. प्रभू येशू ख्रिस्त कोण आहे याची त्यांना थोडी देखील कल्पना नाही. ते पवित्र शास्त्राचा संदेश झुगारून देतात. जरी ते शरीराने जिंवत असले तरी आत्म्याने मेलेले आहेत.

127-75 Reise Marathi Aufl 1 2015-03-27.indd 6-10
10.02.2021 12:21:11